गांवकरी
www.gavakari.net
21 Dec 2025 - Page 14



के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात संस्थेतर्फे माजी खासदार प्रतापदादा सोनवणे यांचा सत्कार करताना तत्कालीन अध्यक्ष बाळासाहेब (भाऊ) वाघ. समवेत मान्यवर.

# मृदू-मितभाषी नेतृत्व : कै.प्रतापदादा सोनवणे

**आदरांजली**

समीर वाघ
अध्यक्ष,
के. के. वाघ शिक्षण संस्था,
नाशिक

**माझे आजोबा तथा पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ व कै. प्रतापदादा सोनवणे यांचे वडील कर्मवीर आबासाहेब तथा नारायण सोनवणे यांच्यात निर्मळ व सलोख्याचे संबंध होते. परस्पर विचारांवर त्यांचा विश्वास होता. कर्मवीर काकासाहेब वाघ व कर्मवीर आबासाहेब तथा नारायण सोनवणे यांच्यानंतर माझे वडील तथा के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व संस्थेचे प्रेरणास्थान कै. बाळासाहेब (भाऊ) वाघ यांनी कै. प्रतापदादा सोनवणे यांच्याशी तोच वसा पुढे चालवला.**

सन १९५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने कर्मवीर काकासाहेब वाघ व कर्मवीर आबासाहेब तथा नारायण सोनवणे हे विधानसभेत 'आमदार' म्हणून निवडून गेले. त्यामुळे वाघ व सोनवणे कुटुंबीयांचे नात्याचे व जिव्हाळ्याचे संबंध होते. प्रतापदादा यांना राजकारणाचे बाळकडू वडिलांकडून जरी मिळालेले असले, तरी त्यांनी आपल्या करिअरची सुरुवात सिव्हिल इंजिनिअरिंगने केली व कालांतराने राजकारणात येऊन समाजाची सेवा केली. त्यांच्यावर कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या विचारांचा पगडा होता. ही बाब ते संस्था भेटीवेळी आवर्जून नमूद करत असत.

पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ व कर्मवीर आबासाहेब तथा नारायण सोनवणे यांच्यासह इतर कर्मवीरांनी मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्याचप्रमाणे प्रतापदादा सोनवणे यांनीदेखील मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्थेचे 'अध्यक्ष' म्हणून सेवा बजावली.

कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेची स्थापना १९७० मध्ये झाली. संस्था ज्ञानसाधनेच्या ५६ व्या वर्षांत पदार्पण करत आहे. इवल्याशा रोपट्यापासून सुरू झालेले हा ज्ञानसाधनेचा प्रवास वटवृक्षात रूपांतरित झालेला आहे. हे करण्यामागे समाजातील थोरल्या-मोठ्या मान्यवरांनी सहकार्य केले. त्यात प्रतापदादा सोनवणे यांचेदेखील मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

कै. बाळासाहेब (भाऊ) वाघ पुढाकाराने प्रतापदादा सोनवणे यांनी पदवीधर 'आमदार' व 'खासदार' असताना के. के. वाघ शिक्षण संस्था व राज्यस्तरीय विनाअनुदानित अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयाचे प्रश्न प्राधान्याने शासन दरबारी मांडले. विद्यार्थी हिताच्या दृष्टीने आवश्यक अशा कामांचा त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला व त्यांपैकी बहुतांश कामे मार्गी लावले.

दोन वेळा पदवीधर 'आमदार' आणि एक वेळा 'खासदार' असतानादेखील समाजकार्यात दुर्लक्ष केले नाही. त्यांची जमेची बाजू अशी की, समोर येईल ते काम जीव ओतून तळमळीने करायचे. सामाजिक कार्यावर श्रद्धा असल्यामुळे त्यांना जनतेचे अमाप प्रेम मिळाले.

मृदू-मितभाषी हा त्यांचा मूळ स्वभाव. राजकारणात असले, तरी त्यांनी वाचन, टेबल टेनिस, जुने सिनेमे व मराठी नाटके पाहणे हे छंद जोपासले. मात्र, त्यांनी स्वत:च्या तब्येतीकडे दुर्लक्ष केले. समाजाला एकत्र करण्याची क्षमता, टेक्निक्स व समाजासाठी झोकून देण्याची वृत्ती तसेच शांत व अभ्यासपूर्ण विषयाची मांडणी यात त्यांचा हातखंडा होता.

राजकीय, सामाजिक, उद्योग, शैक्षणिक व सहकार क्षेत्रात त्यांनी भरीव कामगिरी केलेली आहे. समाजातील काही व्यक्ती समाजासाठी जगतात. समाजाला गती आणि दिशा देण्याचे काम आयुष्यभर करतात. यात आदरणीय कै. प्रतापदादा सोनवणे अग्रस्थानी होते.

वर्षभरातील सर्वांत लहान दिवस म्हणजे २२ डिसेंबर होय. याच २२ डिसेंबर रोजी कै. प्रतापदादा सोनवणे यांनी आयुष्यातील पहिला व शेवटचा श्वास घेतला. जयंती व पुण्यतिथी एकाच दिवशी येणे हा योग फार थोड्यांना लाभतो. त्यांपैकी प्रतापदादा सोनवणे एक होय. जयंती व पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

**(शब्दांकन : प्रसाद जगताप)**